**विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयास वस्तू व सेवाकरासंबंधी कामांसाठी सनदी लेखापालांची सेवा घेण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.६६/विमा प्रशासन,**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०३ जून, २०१९.

**प्रस्तावना :-**

दि.०१.०७.२०१७ पासून वस्तू व सेवाकर कायदा, २०१७ लागू करण्यात आला आहे. वस्तू व सेवाकर हा वस्तू व सेवाकर विभागाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीनेच भरावा लागतो. कायद्याच्या व तांत्रिक ज्ञानाच्या अभावामुळे विमा संचालनालयास वस्तू व सेवाकर भरताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. यास्तव, विमा संचालनालयास वस्तू व सेवाकराशी संबंधित कामांसाठी सनदी लेखापाल (Chartered Accountant) यांची सेवा घेण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

विमा संचालनालयास, खालील अटींच्या अधीनतेने वस्तू व सेवाकर भरण्याच्या अनुषंगाने केवळ कायदेविषयक व तांत्रिक स्वरुपाच्या कामांसाठी सनदी लेखापालांची सेवा घेण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे :-

(१) सदर बाबीसाठी येणारा खर्च भागविण्यासाठी "((०१)विमा निधीचे व्यवस्थापन (२२३५०५३४))" या उपशीर्षाखाली "२८, व्यावसायिक व विशेष सेवा" ह्या उद्दिष्टखाली आवश्यक तरतूद मंजूर करुन घेण्याची जबाबदारी विमा संचालकांची राहील.

(२) सदर बाबीसाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यासाठी विमा संचालनालयाने स्वतंत्र प्रस्ताव सादर करावा.

(३) वस्तू व सेवाकरासंबंधी सनदी लेखापालांची सेवा घेताना विहित पद्धतीने सेवापुरवठादाराची नियुक्ती करण्यात यावी.

२. सदरचा शासन निर्णय, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग तीन, अ.क्र.४ अन्वये महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका अंतर्गत परिच्छेद क्र.२७(२) च्या अनुषंगाने प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashatra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०६०३११३३५८७३०५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SHUBHANGI RAJAN SHETH

Digitally signed by SHUBHANGI RAJAN SHETH
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=ed6787d4f25b2cc00214a10047a10d4fa848c8d19fb8dd a27b4525e3ace2c767, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=e52a2ce9d32e66b1d24d51eaca64e3ebef79bd73 ef9543b72097c742eb1e708a, ou=FINANCE , o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHUBHANGI RAJAN SHETH
Date: 2019.06.03 11:40:15 +05'30'

**( शुभांगी शेठ )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत,**

१. महालेखापाल-१ (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
४. कक्ष अधिकारी (व्यय-६ / अर्थ-१८), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
५. निवडनस्ती, विमा प्रशासन.